कोषागारातून रोख देय अनुदान
केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना
२०१०-११ अंतर्गत पंचायतराज संस्थांना
दुसऱ्या हप्त्याची पुरस्काराची रक्कम
वितरीत करण्याबाबत...
(लेखाशीर्ष २२१५ ९८१७)

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः निर्मल-१३१५/प्र.क्र.२१/पापु-१६
७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक रोड, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
तारीख: ५ जानेवारी, २०१६

<u>वाचा</u>

१. केंद्र शासनाचे मंजूरी आदेश: दि.२८ फेब्रुवारी, २०१२.
२. केंद्र शासनाचे मंजूरी आदेश: दि.२३ फेब्रुवारी, २०१५.
३. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा शासन निर्णय क्रमांक: निर्मल-१३१५/प्र.क्र.२१/ पापु-१६, दि.७ डिसेंबर, २०१५.
४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक: निर्मल-१०१२/प्र.क्र.७६/ पापु-१६, दि.१७ एप्रिल, २०१२.
५. केंद्र शासनाच्या निर्मल ग्राम पुरस्कार योजनेसंदर्भातील मार्गदर्शक सूचना
६. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७ एप्रिल, २०१५.
७. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०१५/प्र.क्र.१११/अर्थ-३, दि.३० जून, २०१५.
८. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३४/कोषा.प्रशा.५, दि.२४ जुलै, २०१५.
९. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक: पूरक-२०१५/प्र.क्र.१४०/अर्थसंकल्प-३, दि.८ ऑगस्ट, २०१५.
१०. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक: पूरक-२०१५/प्र.क्र.१४०/अर्थसंकल्प-३, दि.११ सप्टेंबर, २०१५.

<u>प्रस्तावना</u>

संदर्भाधीन क्र.९ येथील शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-२३) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग-४, दि.३० जुलै, २०१५ यामध्ये प्रसिद्ध करण्यात आले असल्याचे कळविण्यात आले आहे.

२. केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजनेंतर्गत केंद्र हिश्श्यासाठी २२१५ ९८१७ या लेखाशीर्षाखाली व राज्य हिश्श्याच्या २२१५ ९८०८ या लेखाशीर्षाखाली सन २०१५-१६ मध्ये अनुक्रमे रू.१०२५.३० लक्ष व रू.२७०.०० लक्ष एवढा निधी पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. यापैकी केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१२-१३ अंतर्गत केंद्र हिश्श्यासाठी (लेखाशीर्ष २२१५ ९८१७) रू.९१०.८० लक्ष व राज्य हिश्श्यासाठी (लेखाशीर्ष २२१५ ९८०८) रू.२२७.७० लक्ष इतके अनुदान संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना वाचा मधील क्र.३ येथील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेले आहेत. केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ अंतर्गत पंचायतराज संस्थांना दुसऱ्या हप्त्याची पुरस्काराची रक्कम वितरीत करण्यासाठी केंद्र हिश्श्याचे २२१५ ९८१७ या लेखाशीर्षाखाली वित्त विभागाने रू.११४.५० लक्ष (एक कोटी, चौदा लक्ष, पन्नास हजार) एवढा निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिलेला आहे. सदर उपलब्ध केंद्र हिश्श्याचा निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता, याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय

निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ अंतर्गत महाराष्ट्रातील ४४२ ग्रामपंचायतींना व २ पंचायत समितींना केंद्र शासनाने रोख पुरस्कार जाहीर केलेले आहेत. यामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा १०० % आहे. केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ अंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त अर्थसंकल्पबाह्य रू.२८८.२५ लक्ष एवढा निधी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना वाचा मधील क्र.४ येथील शासन परिपत्रकान्वये वितरीत करण्यात आलेला आहे. केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ (दुसरा हप्ता) अंतर्गत केंद्र हिश्श्यासाठी निधी पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. सदर अर्थसंकल्पीत रकमेपैकी केंद्र हिश्श्यासाठीच्या २२१५ ९८१७ या लेखाशीर्षाखाली रू.११४.५० लक्ष (एक कोटी, चौदा लक्ष, पन्नास हजार फक्त) इतके अनुदान संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सोबत जोडलेल्या विवरणपत्र-१ व विवरणपत्र- २ नुसार अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे रोख स्वरूपात मुक्त करण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयाद्वारे मुक्त केलेली रक्कम पुढील अटींवर मंजूर करण्यात येत आहे.

अ) या शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेले अनुदान ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच कारणासाठी खर्च करण्यात यावे. संबंधित पंचायतराज संस्था यांनी या शासन निर्णयाद्वारे मुक्त केलेला निधी, या कार्यक्रमासाठी उघडलेल्या राष्ट्रीयीकृत बँकेतील स्वतंत्र बँक खात्यात जमा करून त्यातून वितरीत केलेल्या निधीचा अहवाल दरमहा पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेस व शासनास सादर करावा.

आ) संबंधित जिल्हा परिषदेने या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त खर्च करू नये.

इ) अट क्र.२-अ आणि २-आ यांची पुर्तता झाली आहे याची खात्री करण्यासाठी, महालेखापाल-१, मुंबई व महालेखापाल-२, नागपूर यांच्याकडे जिल्हा परिषदेच्या

संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी लेखे तपासणीसाठी, सर्व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत.

ई) सदर रक्कम केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतूदींनुसार तसेच या संदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनेप्रमाणे/ आदेशाप्रमाणे खर्च करण्यात यावी.

उ) शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनेप्रमाणे जिल्हा परिषदांनी या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व ताळमेळाचे अहवाल विहित कालावधीत या विभागातील पापु-०४, पापु-१६ व पापु-२० या कार्यासनांस सादर करावा.

ऊ) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७ एप्रिल, २०१५, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.१११/अर्थ-३, दि.३० जून, २०१५ व शासन परिपत्रक क्र.संकीर्ण- २०१५/ प्र.क्र.३४/कोषा.प्रशा.५, दि.२४ जुलै, २०१५ मधील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करून आवश्यक त्या बाबींची पुर्तता करून कार्यपूर्ती अहवाल/नमूद प्रमाणपत्रे शासनास त्वरित सादर करावीत.

ऋ) सदर रक्कम खर्च झाल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास त्वरित सादर करावे. याबाबत कोणतीही दिरंगाई करण्यात येऊ नये.

३. केंद्र हिश्श्यासाठी हा खर्च "मागणी क्रमांक Y-२, २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०२ जलनि:स्सारण व स्वच्छता, १०७ मलप्रणाल सेवा, (०२) ग्रामसफाई कार्यक्रम, (०२) (०८) निर्मल ग्राम पुरस्कार (केंद्र हिस्सा) (२२१५ ९८१७)" ३१ सहायक अनुदाने या लेखाशीर्षाखाली घालावा.

४. सदर शासन निर्णय हा नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१९१/१४४३, दि.१.९.२०१५ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.४२९/व्यय-३, दि.३०.९.२०१५ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार मुक्त करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०५१४५१२६२६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Dattatray Salve

Digitally signed by Ashok Dattatray Salve
DN: CN = Ashok Dattatray Salve, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Under Secretary
Date: 2016.01.05 15:18:16 +05'30'

(अ.द.साळवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

२. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ मुंबई/नागपूर (लेखा परीक्षा व अनुज्ञेयता).
३. विभागीय आयुक्त, विभाग कार्यालय, सर्व.
४. उपायुक्त विकास, सर्व विभागीय आयुक्त यांचे कार्यालय.
५. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती सर्व.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांनी सदर शासन निर्णय सर्व संबंधित ग्रामपंचायतींच्या निदर्शनास आणावा.
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
८. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/नागपूर.
९. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, (WSSO), बेलापूर, नवी मुंबई.
१०.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.), जिल्हा परिषद, सर्व.
११.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१२.उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, जिल्हा परिषद, सर्व.
१३.जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१४.नियोजन विभाग (कार्यासन-१४४३) मंत्रालय, मुंबई.
१५.वित्त विभाग, (व्यय-३) मंत्रालय, मुंबई.
१६.कार्यासन क्र.पापु-०४, पापु-०८ व पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७.निवड नस्ती, कार्यासन पापु-१६.

विवरणपत्र-१

केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ च्या दुसऱ्या हप्त्याचे निधी वितरण शासन निर्णय क्र.निर्मल-१३१५/प्र.क्र.२१/पापु-१६, दि. ५ जानेवारी, २०१६ सोबतचे सहपत्र.

(रू.लाखांत)

अ.क्र.	जिल्हा परिषदेचे नाव	पुरस्कार प्राप्त ग्रा.पं. संख्या	पुरस्काराची एकूण रक्कम	दि.१७ एप्रिल, २०१२ च्या शासन परिपत्रकान्वये मुक्त करण्यात आलेली पहिल्या हप्त्याची रक्कम (५० %)	या शासन निर्णयान्वये मुक्त करण्यात येत असलेली दुसऱ्या हप्त्याची रक्कम (लेखाशीर्ष २२१५ ९८१७) (५० %)
१	२	३	४	५	६
१	ठाणे	४६	७४.५०	३७.२५	०.००
२	पालघर	१०	०.००	०.००	०.००
३	रायगड	४	८.००	४.००	४.००
४	रत्नागिरी	५१	७४.००	३७.००	०.००
५	सिंधुदूर्ग	१४	२४.००	१२.००	१२.००
६	नाशिक	३	३.००	१.५०	०.००
७	धुळे	०	०.००	०.००	०.००
८	नंदूरबार	४	३.५०	१.७५	१.७५
९	जळगाव	१६	२०.००	१०.००	१०.००
१०	अहमदनगर	१	०.५०	०.२५	०.२५
११	पुणे	३	२.००	१.००	१.००
१२	सातारा	४	४.००	२.००	२.००
१३	सांगली	२४	३१.००	१५.५०	१५.५०
१४	सोलापूर	७०	८१.००	४०.५०	४०.५०
१५	कोल्हापूर	१५	४१.५०	२०.७५	०.००
१६	औरंगाबाद	१	०.५०	०.२५	०.२५
१७	जालना	२८	२९.५०	१४.७५	०.००
१८	परभणी	१३	९.००	४.५०	०.००
१९	हिंगोली	२९	१८.५०	९.२५	०.००
२०	बीड	५	५.००	२.५०	०.००
२१	नांदेड	३	१.५०	०.७५	०.७५
२२	उस्मानाबाद	९	१६.५०	८.२५	०.००
२३	लातूर	११	८.००	४.००	०.००
२४	बुलढाणा	३	२.५०	१.२५	१.२५
२५	अकोला	०	०.००	०.००	०.००

अ.क्र.	जिल्हा परिषदेचे नाव	पुरस्कार प्राप्त ग्रा.पं. संख्या	पुरस्काराची एकूण रक्कम	दि.१७ एप्रिल, २०१२ च्या शासन परिपत्रकान्वये मुक्त करण्यात आलेली पहिल्या हप्त्याची रक्कम (५० %)	या शासन निर्णयान्वये मुक्त करण्यात येत असलेली दुसऱ्या हप्त्याची रक्कम (लेखाशीर्ष २२१५ ९८१७) (५० %)
२६	वाशिम	०	०.००	०.००	०.००
२७	अमरावती	१	१.००	०.५०	०.००
२८	यवतमाळ	७	६.५०	३.२५	०.००
२९	वर्धा	३७	३८.५०	१९.२५	०.००
३०	नागपूर	१०	१०.५०	५.२५	५.२५
३१	भंडारा	७	७.००	३.५०	०.००
३२	गोंदिया	२	३.००	१.५०	०.००
३३	चंद्रपूर	११	१२.००	६.००	०.००
३४	गडचिरोली	०	०.००	०.००	०.००
एकूण		४४२	५३६.५०	२६८.२५	९४.५०
अक्षरी रूपये			पाच कोटी, छत्तीस लाख, पन्नास हजार फक्त	दोन कोटी, अडुसष्ट लाख, पंचवीस हजार फक्त	चौऱ्याण्णव लाख, पन्नास हजार फक्त

Ashok Dattatray Salve

Digitally signed by Ashok Dattatray Salve
DN: CN = Ashok Dattatray Salve, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Under Secretary
Date: 2016.01.05 15:17:13 +05'30'

(अ.द.साळवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र-२

केंद्र पुरस्कृत निर्मल ग्राम पुरस्कार योजना २०१०-११ च्या दुसऱ्या हप्त्याचे निधी वितरण शासन निर्णय क्र.निर्मल-१३१५/प्र.क्र.२१/पापु-१६, दि. ५ जानेवारी, २०१६ सोबतचे सहपत्र.

(रू.लाखांत)

अ.क्र.	जिल्हा परिषदेचे नाव	पुरस्कार प्राप्त पंचायत समितींची संख्या	पुरस्काराची एकूण रक्कम	दि.१७ एप्रिल, २०१२ च्या शासन परिपत्रकान्वये मुक्त करण्यात आलेली पहिल्या हप्त्याची रक्कम (५० %)	या शासन निर्णयान्वये मुक्त करण्यात येत असलेली दुसऱ्या हप्त्याची रक्कम (लेखाशीर्ष २२१५ ९८१७) (५० %)
१	२	३	४	५	६
१	सातारा	२	४०.००	२०.००	२०.००
एकूण		२	४०.००	२०.००	२०.००
अक्षरी रूपये			चाळीस लाख फक्त	वीस लाख फक्त	वीस लाख फक्त

Ashok Dattatray Salve

Digitally signed by Ashok Dattatray Salve
DN: CN = Ashok Dattatray Salve, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Under Secretary
Date: 2016.01.05 15:17:36 +05'30'

(अ.द.साळवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन